**नि.दि.मु.क्र. ३५/२०१० मधील नि.क्र. २१० ते २१२ वरील संयुक्तिक आदेश**

अर्जांचे अवलोकन केले. असे दिसून येते की, तिनही अर्ज हे प्रतिवादी क्र. १३ हा दि. २२/०३/२०१६ रोजी मयत झालेला असून; अर्जातील नमूद त्याच्या वारसांना अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून कार्यवाही अवसान करण्याचा व दुरुस्ती करण्याचा आदेश होवून मिळण्यासाठी दाखल करण्यात आलेले असल्याने ते एकत्रीतपणे विवेचनासाठी घेण्यात आलेले आहेत.

०२. अर्जातील वादीचे थोडक्यात असे कथन आहे की, प्रतिवादी क्र. १३ हा दि. २२/०३/२०१६ रोजी मुंबई येथे मयत झालेला असून; त्याच्या मृत्यूचा दाखला आणि वारसांची माहिती ९० दिवसांच्या कालावधीत मिळविणे वादीस शक्य न झाल्याने सदर प्रतिवादीच्या वारसांना अभिलेखावर वादीस घेता आलेले नाही. वादीने जाणुनबुजून त्यामागे कोणतीही टाळाटाळ केलेली नाही. मयत प्रतिवादी क्र. १३ याचा अर्जातील नमूद वारस हा पक्षकार म्हणून सामील असणे आवश्यक आहे. सबब मयत प्रतिवादी क्र. १३ याच्याविरुध्द दाव्याची कार्यवाही अवसान करणेचा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येवून; ४२ दिवसांचा झालेला विलंब माफ करण्यात यावा व प्रतिवादी क्र. १३अ म्हणून अजित विष्णू भोगांवकर यास मयत प्रतिवादी क्र. १३ याचा कायदेशीर वारस म्हणून अभिलेखावर सामील करुन देण्याची वादीला परवानगी देण्यात यावी. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज मंजूर करण्याची विनंती वादीने केली आहे.

०३. तिनही अर्जांवर प्रतिवादी क्र. १ याने आपले म्हणणे सादर करुन अर्जास आक्षेप नोंदविला आहे. प्रतिवादी क्र. १ याचे अर्जांवरील थोडक्यात असे म्हणणे आहे की, मयत प्रतिवादी क्र. १३ याच्या वारसांना अभिलेखावर घेण्यास झालेला विलंब माफ होवून मिळणेसाठी वादीने दिलेले कारण योग्य व पुरेसे नाही. प्रतिवादी क्र. १३ हा मयत झाल्यापासून वादीस त्याची माहिती असून; अर्जात कोणतेही योग्य व पुरेसे कारण नमूद नसल्याने आणि सदर प्रतिवादीच्या कायदेशीर वारसास अभिलेखावर आणण्यास वादीने विलंब केल्याने अर्ज नामंजूर करण्यात यावे. इत्यादी सर्व बाबी नमूद करुन अर्ज नामंजूर करण्याची विनंती प्रतिवादी क्र. १ याने केली आहे.

०४.     प्रस्तावित प्रतिवादी क्र. १३ अ याने नि.क्र. २१६ वर तिनही अर्जांकरीता आपले म्हणणे दाखल केलेले आहे. मयत प्रतिवादी क्र. १३ याच्या वारसाचे असे म्हणणे आहे की, त्याचेसह त्याच्या बहिणी नामे श्रध्दा व सुमेधा यांना वादीने मयत प्रतिवादी क्र. १३ याचे वारस म्हणून सामील करुन घेणेस न्यायालयाकडे विनंती करावयास हवी होती. सदर वारसासोबत त्याच्या दोन्ही बहिणींना वारस म्हणून पक्षकार करण्यात यावे व त्यांना दावा समन्स पाठविण्यात यावे आणि तसे निर्देश वादीस द्यावेत. इत्यादी सर्व बाबी प्रस्ताविक प्रतिवादी क्र. १३ अ याच्यातर्फे नमूद करण्यात आलेल्या आहेत.

०५.     अर्जातील नमूद कारणे पाहता; ती प्रथमदर्शनी संयुक्तिक व सबळ वाटत नाहीत. वादीने अर्जामध्ये मयत प्रतिवादी क्र. १३ याच्या अर्जातील नमूद वारसाव्यतिरिक्त अन्य वारस असल्याचे कुठेही म्हटलेले नाही. प्रस्तावित प्रतिवादी क्र. १३ अ याच्या नि.क्र. २१६ वरील म्हणण्यातील त्याच्या बहिणी या सुध्दा मयत प्रतिवादी क्र. १३ याच्या वारस आहेत किंवा कसे हा मुद्दा राखून ठेवून न्यायाच्या दृष्टिकोनातून तिनही अर्ज वादीने याकामी केलेला विलंब पाहता; प्रत्येकी रक्कम २००/— रुपये खर्च आकारुन मंजूर करणे उचित राहील. खर्चाची रक्कम मा. जिल्हा विधीसेवा प्राधिकरण सिंधुदुर्ग—ओरोस यांच्याकडे जमा करणे न्यायोचित होईल. करीता खालीलप्रमाणे अंतिम आदेश निर्गमित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. नि.क्र. २१० ते २१२ वरील अर्ज अर्जदारावर प्रत्येकी रक्कम रु. २००/—(रुपये दोनशे फक्त) इतका खर्च आकारुन मंजूर करण्यात येतात.
२. मयत प्रतिवादी क्र. १३ यांच्याविरुध्द दाव्याची कार्यवाही अवसान करण्याचा झालेला आदेश रद्दबातल करण्यात येवून अर्जदारास सदर मयत प्रतिवादी क्र. १३ याच्या वारसांना अभिलेखावर समाविष्ट करु देण्याची परवानगी देण्यात येते.
३. अर्जदाराने प्रस्तुतचा आदेश झाल्यापासून १४ दिवसांच्या कालावधीत खर्चाची

रक्कम जमा करावयाची असून; त्याप्रमाणे नि.क्र. १ वर सदर कालावधीत दुरुस्ती करुन घ्यावयाची आहे.

४. जमा झालेली खर्चाची रक्कम मान. जिल्हा विधीसेवा प्राधिकरण सिंधुदुर्ग –ओरोस यांच्याकडे पाठविण्यात यावी.

(आदेश खुल्या न्यायालयात घोषित केला.)

सही/–

दिनांक :–२७ जुलै, २०१७  
ठिकाण :–मालवण.

(आर.आर.काळे)  
दिवाणी न्यायाधीश, क.स्तर मालवण.